# सचिनची निवृत्ती ठरली 'तेंडल्या'चे कारण

पुणे, दि. १७ फेब्रुवारी २०२५ : "इस्लामपुरातून मी पुण्यात आलो ते सचिन तेंडुलकर बनायला, मात्र २०१२ साली सचिन तेंडुलकर यांनी वनडे क्रिकेटमधून रिटायरमेंट घोषित केली, त्यावेळी माझी राज्यसेवा परीक्षेच्या केवळ मुलाखत बाकी होती आणि तरी मी एक भावनिक निर्णय घेतला. सचिनने आपल्याला आजवर इतकं दिलं तर आपणही त्याला काहीतरी द्यावं या भावनेने चित्रपटाची संकल्पना पुढे आली आणि मी 'तेंडल्या' बनवला,"असे चित्रपटाचे दिग्दर्शक सचिन जाधव यांनी सांगितले.

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा( पीफ)मध्ये 'तेंडल्या' हा चित्रपट दाखवण्यात आला त्यानंतर जाधव यांनी या चित्रपटाचा प्रवास उलगडून सांगितला. जाधव म्हणाले, "मी सचिन तेंडुलकर यांचा खूप मोठा चाहता आहे. त्यांना बघत मोठा झालो आणि त्यांच्यासारखे क्रिकेटमध्ये यावे असे वाटत होते. पण मी पुण्यात आलो तेंव्हा त्यांनी निवृत्ती घेतली. मग क्रिकेटर व्हायचे सोडले आणि सचिनसाठी चित्रपट करायचे ठरवले. त्यातून 'तेंडल्या' तयार झाला.

ते म्हणाले, "या चित्रपटातील ८० टक्के पात्रे ही माझ्या गावातीलच आहेत. चित्रपटात लहान मुलांची मोठी पलटन आहे, त्यासाठी मी इस्लामपूरच्या जवळील १०० जिल्हा परिषदेच्या शाळेतील ६००० मुलांमधून २० जणांची चित्रपटासाठी निवड केली. सोबत चित्रपटात १०० पात्रे असून, यातून जवळपास ७० लोकांनी कधी कॅमेराही पाहिलेला नव्हता, अशा परिस्थितीत चित्रपटाचं शुटींग सुरु केले. नवोदित दिग्दर्शक आणि नवोदित कलाकार यांना येऊन अनोखा चित्रपट बनवणे हे एखाद्या धाडसापेक्षा कमी नव्हते."

## लच्ची

महोत्सवामध्ये ‘लच्ची’ हा कृष्णा गौडा दिग्दर्शित चित्रपट दाखवण्यात आला. कन्नड भाषेतील ‘लच्ची’ चित्रपट ललिता नाईक यांच्या कादंबरीवर आधारित आहे. ही कादंबरी एका विशिष्ट समाजाच्या सत्यघटनांवर आधारित आहे. लच्ची चित्रपट समाजातील दुर्बल घटकांच्या संघर्षांवर प्रकाश टाकतो आणि स्त्रीच्या दुःखाचे चित्रण करतो. चित्रपटानंतर गौडा बोलत होते. ते म्हणाले, की ‘लच्ची’ हा केवळ एक चित्रपट नसून समाजातील वास्तववादी परिस्थितीचे प्रतिबिंब आहे.

कृष्णा गौडा यांना नाट्यक्षेत्र आणि रेडिओमध्ये काम करण्याचा अनुभव आहे. त्या अनुभवामुळे पटकथेच्या मांडणीत कोणत्याही अडचणी आल्या नाहीत असे त्यांनी सांगितले. ‘लच्ची’मध्ये पोलीस खात्याच्या निष्काळजीपणावर भाष्य केले आहे. ते म्हणाले, की गुन्हेगारी पत्रकारितेच्या अनुभवामुळे पोलिस यंत्रणेची चांगली जाण आहे. त्यामुळे चित्रपटात पोलीस खात्याचे वास्तववादी चित्रण आहे, जे व्यावसायिक चित्रपटांपेक्षा बरेच वेगळे आहे.

## कारकेन

नेंडींग लोडर लिखित आणि दिग्दर्शित ‘कारकेन’ हा अरुणाचल प्रदेशासारख्या दुर्गम भागात व्यवसायाने डॉक्टर असलेल्या आणि अभिनेता बनू पाहणाऱ्या कारकेन नावाच्या तरुणाची प्रेरणादायी गोष्ट आहे. लोडरने स्वतःच यात ‘कारकेन’ नावाचे पात्र साकारले आहे. ते म्हणाले, "मला स्वतःच्या भागातील प्रश्नांना घेऊन एक चित्रपट बनवायचा होता. त्यामुळे जवळपास वर्षभर मी यावर लिहित होतो. दुर्गम भागात आरोग्याच्या सोईसुविधांची असलेली कमतरता, ‘एलजीबीटीक्यूआयए’ समुदायातील भावना आजूबाजूला पाहून लिहित गेलो. हा चित्रपट म्हणजे लोकांच्या मनातील भावनिक आणि तात्विक द्वंद आहे.’

ते म्हणाले, की हा चित्रपट स्वतःची असलेली आवड तसेच स्वतःच पौरुषत्व नव्याने उलगडलेल्या आणि लिंग परिवर्तन करु इच्छिणाऱ्या बहिणीविषयी सांगतो. स्वतःच चित्रपटाचे दिग्दर्शक असल्यामुळे अभिनय करताना लेखक आणि दिग्दर्शकाच्या अपेक्षा पूर्ण करता आल्या.

## सांगळा

'सांगळा' हा चित्रपट म्हणजे मराठवाड्यातील भीषण दुष्काळाशी झगडत जगण्याची एका वयोवृद्ध शेतकऱ्याच्या लढाईची कथा आहे. उन्हाळ्यात विहिरीच्या तळाशी साचणाऱ्या थोड्या पाण्यासाठी सांगला हा शब्द वापरला जातो. महिनोंमहिने थेंबाथेंबाने साचलेले पाणी काही मिनिटांत उपसले जाते, यावरून या भागातील पाण्याच्या संकटाची व्याप्ती समजते. ही हृदयस्पर्शी कहाणी मांडणारा हा चित्रपट, रावबा गजमल यांनी दिग्दर्शित केला आहे.

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मराठी चित्रपट स्पर्धा विभागात स्पर्धेत निवडले गेलेल्या सात चित्रपटांपैकी 'सांगळा' हा एक आहे. गजमल यांनी स्पष्ट केले की, हा चित्रपट त्या शेतकऱ्यांना समर्पित आहे, जे सांगळ्याप्रमाणे परिश्रम घेत राहतात.. "हा चित्रपट केवळ शेतकऱ्यांच्या संघर्षाबद्दल नाही, तर आशा आणि जिद्दीचे महत्त्वही अधोरेखित करतो. शेतकऱ्यांचे श्रम आणि त्यांची समाजासाठी असलेली महत्त्वाची भूमिका लोकांनी समजून घेतली पाहिजे, ही आमची इच्छा आहे," असे गजमाल यांनी सांगितले. हा गाजवल यांचा पहिलाच चित्रपट आहे. पहिल्यांदाच दिग्दर्शक आणि निर्माता म्हणून काम करताना गजमल यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. योग्य कलाकार निवडण्यापासून ते आर्थिक पाठबळ मिळवण्यापर्यंत हा प्रवास सोपा नव्हता. मात्र, ही महत्त्वाची कथा लोकांसमोर आणण्याच्या आपल्या जिद्दीमुळे हा चित्रपट पूर्ण केल्याचे त्यांनी सांगितले.